# पुणे महानगरपालिका
## उप आयुक्त (सेवकवर्ग विभाग)
Process  Manual Format.

विभाग :- खातेनिहाय चौकशी विभाग

कामाचे नाव :- खातेनिहाय चौकशी

| टप्पा क्रमांक | पद | करावयाचे काम | आवश्यक कागदपत्रे | कलम/नियम/स्थायी आदेश/परिपत्रक इ. | कामाला लागणारा वेळ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Designation | Activity Description | Required Documents | Applied Rule/ Section/ Standing Order etc. | Time Required | Remark |
| १ | उप आयुक्त सेवकवर्ग विभाग | खातेनिहाय चौकशीस मान्यता मिळणेबाबतचा खात्याकडून पाठविण्यात आलेला प्रस्ताव उप आयुक्त सेवकवर्ग यांचे कार्यालयाकडून खातेनिहाय चौकशी विभागास प्राप्त झालेनंतर सदरचा प्रस्ताव मा उप आयुक्त सेवकवर्ग यांचे शिफारशीने मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला जातो. | खात्याने प्रकरणात सादर केलेली कागदपत्रे | | ३ दिवस | |
| २ | मा. महा. आयुक्त / मा. अति.महा. आयुक्त(वि) | मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) यांनी खातेनिहाय चौकशी करण्यास मान्यता दिलेनंतर मा. उप आयुक्त सेवकवर्ग यांचे कार्यालयाकडून खातेनिहाय चौकशी विभागास प्राप्त झालेले मान्यतेचेप्रकरण संबंधीत खात्याकडे उप आयुक्त सेवकवर्ग यांचेमार्फत पाठविले जाते. | खात्याने प्रकरणात सादर केलेली सर्व कागदपत्रे व मान्यतेचे पत्र. | मुंबई प्रांतिम मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ व मनपा सेवाविनियम क्र.५६ अन्वये मा. महा. आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन | २ दिवस | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | उप आयुक्त सेवकवर्ग | खात्याकडून उप आयुक्त सेवकवर्ग यांचेमार्फत सादर करण्यात आलेले ज्ञापन व दोषारोपपत्र मा. महा. आयुक्त /मा.अति.महा. आयुक्त(वि) यांचेकडे उप आयुक्त सेवकवर्ग यांचे शिफारशीनी स्वाक्षरीसाठी पाठविले जाते. | खात्याने प्रकरणात सादर केलेली सर्व कागदपत्रे | मुंबई प्रांतिम मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ व मनपा सेवाविनियम क्र.५६ | ४ दिवस | |
| ४ | मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) | मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) यांनी ज्ञापन व दोषारोपपत्रावर स्वाक्षरी केल्यानंतर सदरचे प्रकरण उप आयुक्त सेवकवर्ग यांचे कार्यालयाकडून खातेनिहाय चौकशी विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर सदरचे संपूर्ण प्रकरण ज्ञापन व दोषारोपपत्रासह संबंधीत अपचारी सेवकावर दोषारोप बजावण्यासाठी संबंधीत खात्याकडे उप आयुक्त सेवकवर्ग यांचेमार्फत संबंधीत खात्याकडे पाठविले जाते. | खात्याने प्रकरणात सादर केलेली सर्व कागदपत्रे | | ३ दिवस | |
| ५ | उप आयुक्त सेवकवर्ग विभाग | खात्याकडून उप आयुक्त सेवकवर्ग यांचे कार्यालयामार्फत चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांचे नेमणूकीबाबत मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) यांना सादर केलेल्या निवेदनास अनुसरुन खातेनिहाय चौकशी विभागाकडून प्रस्तुत प्रकरणी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांचे नेमणूकीचा आदेश तयार करुन सदरच्या आदेशावर मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) यांची स्वाक्षरी होणेसाठी सदरचे प्रकरण उप आयुक्त सेवकवर्ग यांचेमार्फत मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) यांचेकडे पाठविले जाते. | खात्याने सादर केलेली सर्व कागदपत्रे | मुंबई प्रांतिम मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ व मनपा सेवाविनियम क्र.५६ अन्वये मा. महा. आयुक्त/मा. अति. महा. आयुक्त(वि) यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार | ४ दिवस | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) | मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) यांची आदेशावर स्वाक्षरी झाल्यानंतर उप आयुक्त सेवकवर्ग यांचेकडून खातेनिहाय चौकशी विभागास प्राप्त झालेले आदेश उप आयुक्त सेवकवर्ग यांचेमार्फत संबंधीत खात्याकडे अपचारी सेवक व सादरकर्ता अधिकारी यांना बजावण्यासाठी संबंधीत खात्याकडे संपूर्ण प्रकरणासह खातेनिहाय चौकशी विभागाकडून पाठविले जाते तसेच सदर आदेशाच्या प्रती मा. कार्यालय अधिक्षक, मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) कार्यालय, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखापाल, सल्लागार कामगार, सेवकवर्ग विभाग यांच्या कार्यालयाकडे आदेशाच्या प्रती पाठविल्या जातात. | खात्याने सादर केलेल्या प्रकरणातील फाईलमधील सर्व कागदपत्रे | | २ दिवस | |
| ७ | मा. चौकशी अधिकारी | मा. चौकशी अधिकारी यांनी मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त (वि) यांना उप आयुक्त सेवकवर्ग यांचेमार्फत सादर केलेला चौकशीचा निष्कर्ष अहवाल उप आयुक्त सेवकवर्ग यांचे कार्यालयाकडून खातेनिहाय चौकशी विभागास प्राप्त झाल्यानंतर निष्कर्ष अहवालासह अपचारी सेवकास निष्कर्ष अहवालावर खुलासा सादर करणेकामी द्यावयाचे पत्र संपूर्ण प्रकरणासह मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) यांचेकडे स्वाक्षरीसाठी सादर केले जाते. | मा. चौकशी अधिकारी यांनी सादर केलेली खातेनिहाय चौकशी प्रकरणाची फाईल. | | ४ दिवस | |
| ८ | मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) | मा. महा. आयुक्त/मा. अति.महा. आयुक्त(वि) यांचेकडून निष्कर्ष अहवाल अवलोकून होवून तसेच खुलासा सादर करणेबाबत सादर केलेल्या पत्रावर त्यांची स्वाक्षरी झाल्यानंतर सदरचे प्रकरण उप आयुक्त सेवकवर्ग यांचेमार्फत खातेनिहाय चौकशी विभागास प्राप्त झाल्यानंतर संबंधीत अपचारी सेवकास निष्कर्ष अहवालाची प्रत सदर पत्रासह संबंधीत अपचारी सेवकावर बजावण्यासाठी संबंधीत खात्याकडे पाठविले जाते. | खुलासा सादर करणेचे पत्र व निष्कर्ष अहवालाची प्रत | | ३ दिवस | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | उप आयुक्त सेवकवर्ग | उप आयुक्त सेवकवर्ग यांचेमार्फत अपचारी सेवकाने निष्कर्ष अहवालावर केलेला खुलासा उप आयुक्त सेवकवर्ग यांचे कार्यालयाडून खातेनिहाय चौकशी विभागास प्राप्त झाल्यानंतर सदर खुलाशाचे अवलोकन करुन सिध्द झालेल्या आरोपाचे परिणामी शास्तीबाबत मा. महा. आयुक्त/मा. अति. महा. आयुक्त(वि) यांचेकडे उप आयुक्त सेवकवर्ग यांचेमार्फत निवेदन सादर केले जाते. | खातेनिहाय चौकशीचे संपूर्ण प्रकरण. (फाईलसह) | | ८ दिवस | |
| १० | मा. महा. आयुक्त/मा. अति. महा. आयुक्त(वि) | मा. महा. आयुक्त/मा. अति. महा. आयुक्त(वि) यांनी शास्तीबाबत खातेनिहाय चौकशी विभागाने सादर केलेल्या निवेदनावर दिलेल्या आदेशानुसार अपचारी सेवकाविरुध्द शास्तीबाबतची पुढील कार्यवाही करणे उदा. कारणेदाखवा नोटिस देणे, किरकोळ स्वरुपाची शिक्षा प्रस्तावित करण्यात आली असल्यास सदर शिक्षेचे आज्ञापत्र तयार करुन सदर आज्ञापत्रावर स्वाक्षरी झाल्यानंतर सदरचे आज्ञापत्र संबंधीत अपचारी सेवकास त्याचे खात्यामार्फत बजाविणे. तसेच ज्या अपचारी सेवकास जबर शिक्षा प्रस्तावित करण्यात आली आहे. अशा प्रकरणी संबंधीत अपचारी सेवकाचे शिक्षेबाबत मा. स्थायी समितीमार्फत मा. मनपा मुख्य सभेच्या मान्यतेसाठी मा.अति. महा. आयुक्त (वि) यांचेमार्फत मा. महा. आयुक्त यांचेकडे विषयपत्र स्वाक्षरी होणेसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविले जाते. | विषयपत्रासह खातेनिहाय चौकशीचे संपूर्ण प्रकरण. (फाईलसह) | मुंबई प्रांतिम मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) अन्वये | १५ दिवस | |
| ११ | मा. नगर सचिव कार्यालय | मा. मुख्य सभेने शास्तीबाबत मान्यता दिलेनंतर मान्य झालेला ठराव नगरसचिव कार्यालयाकडून उप आयुक्त सेवकवर्ग विभाग यांचेमार्फत खातेनिहाय चौकशी विभागास प्राप्त झाल्यानंतर सदर ठरावास अनुसरुन अपचरी सेवकावर बजवावयाचे शिक्षेचे आज्ञापत्र तयार करणे उप आयुक्त सेवकवर्ग यांच्यामार्फत मा. महापालिका आयुक्त यांची आज्ञापत्रकावर स्वाक्षरी होणेसाठी त्यांचेकडे सादर करणे व मा. महापालिका आयुक्त यांची आज्ञापत्रावर स्वाक्षरी झाल्यानंतर सदरचे आज्ञापत्र संबंधीत सेवकास बजावणे. | विषयपत्रासह खातेनिहाय चौकशीचे संपूर्ण प्रकरण. (फाईलसह) | मुंबई प्रांतिम मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) अन्वये | ८ दिवस | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | विधी सल्लागार | खातेनिहाय चौकशीच्या अनुषंगाने अपचारी सेवकाने मे. कोर्टात दावा दाखल केल्यानंतर सदर दाव्याच्या अनुषंगाने खात्यास आवश्यक असणारी खातेनिहाय चौकशीबाबतची कागदपत्रे संबंधीत खात्याच्या मागणीनुसार वेळोवेळी पुरविणे. तसेच विधी सल्लागार कार्यालयाकडून मा. उप आयुक्त सेवकवर्ग यांचेकडे पाठविण्यात आलेली दाव्याची कागदपत्रेपुढील पूर्ततेसाठी संबंधीत खात्याकडे पाठविणे. | विधी सल्लागार कार्यालयाकडून पाठविण्यात आलेली सर्व कागदपत्रे. | | ३ दिवस | |